# 🚩शिवराज्याभिषेक- ऐतिहासिक सुवर्णक्षण🚩

**डॉ. नानासाहेब गुरुळे**
(कार्यशाळा अधीक्षक, के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक)

6 जून 1674 रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक झाला. भारतीय इतिहासात या घटनेकडे खूप महत्वाची घटना म्हणून पाहिले जाते. कारण त्या काळात संपूर्ण भारत परकिय आक्रमणांनी ग्रासला होता आणि एवढ्या मोठ्या शत्रूंना तोंड देऊन छत्रपतींनी आपला राज्याभिषेक केला होता. ही भारतीय इतिहासातील सामान्य गोष्ट नव्हती.

राज्याभिषेक करून राजा ही पदवी धारण करुन भारतातील परकीयांना शह देणे ही त्या काळात खुप धाडसाची कामगिरी छत्रपतींनी केली म्हणून भारतीय इतिहासात या घटनेकडे एक युगप्रवर्तक घटना म्हणून बघितले जाते. राज्याभिषेक झाल्यानंतर छत्रपतींनी अनेक सुधारणा घडवून आणल्या. परकीय शत्रूंना शह देणारा छत्रपती म्हणून शिवाजी महाराजांकडे बघितले जाऊ लागले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले. त्यांच्या राज्यात सर्व गोरगरीब श्रीमंतांना एकच न्याय मिळत असे. न्यायाच्या बाबतीत भेदभाव केला जात नसे. अन्याय करणाऱ्यास कठोरात कठोर शिक्षा दिली जाई. स्वराज्यात संकटकाळात रयतेला वेळोवेळी मदत केली जाईल. शिवाजी महाराज स्वतः रायते मध्ये फिरून रयतेची परिस्थिती जाणून घेत असे. वेळोवेळी येणार्‍या संकटांना मात देत महाराजांनी आपल्या रयतेला सुखी आणि समाधानी ठेवले होते, म्हणूनच महाराजांचे राज्य हे *रयतेचे राज्य* होते असे म्हटले जाते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे खऱ्या अर्थाने न्यायाने चालणारे राज्य होते. छत्रपतींनी स्वराज्यात शत्रूच्या माता-भगिनींना कधीही त्रास होऊ दिला नाही. भारतात होऊन गेलेला एकमेव चारित्र्यसंपन्न राजा म्हणजे शिव छत्रपती शिवाजी महाराज होय.

शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकावेळी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. स्वतंत्र राज्याची ‘राज्याभिषेक शक’ ही नवीन कालगणना सुरू केली. आर्थिक व्यवहारासाठी शिवराई आणि होन अशी मोडी (मराठी) लिपीतील नाणी चलनात आणली. पूर्वीची मुसलमानी पद्धतीची लेखनपद्धती बदलून हिंदु पद्धतीची लेखनपद्धती विकसित करून लेखनप्रशस्ती, राज्यव्यवहारकोष हे मराठीतील ग्रंथ निर्माण करून घेतले. परकियाच्या तावडीतून सोडविलेल्या गडकोट किल्ल्यांना पूर्वीही मराठी नावे दिली व आपल्या लोककल्याणकारी स्वतंत्र राज्याचा विचार महाराष्ट्रापुरताच मर्यादित न ठेवता संपूर्ण भारत-जगभरात पोहोचविण्यासाठी राज्याभिषेकानंतर परकीय सत्ताधिशाविरुद्ध आक्रमणे, मोहिमांचा धडाका आरंभ केला.

हिंदुस्थानच्या इतिहासाला कलाटणी देणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे🚩 महत्व सर्वत्र पोहोचावे, शिवछत्रपतीच्या उदात्त कार्याचा आदर्श भावी पिढीने घेऊन उत्तुंगपणे मार्गक्रमण करावे. या उद्देशाने *शिवराज्याभिषेक दिन* ✨ हा विविध उपक्रमाने साजरा केला जातो. इतक्या वर्षानंतरही तरूण पिढीला हा राजा आपला वाटतो. आता गरज आहे ती खऱ्या अर्थाने विचार समजून घेण्याची. शिवरायांनी केवळ मैदानावरच्या लढाया खेळल्या नाहीत तर आपल्या लेखणीने आणि वाणीने अनेक लढाया जिंकल्या हे समजून देण्याची वेळ आली आहे.

आज आपण शिवराज्याभिषेक दिन साजरा करताना शिवछत्रपतींच्या कृतीतून 🦁 शिवविचारांची प्रेरणा घ्यायची की नुसते 😞 प्रतीकात्मक अभिषेक सोहळे साजरे करायचे याचा विचार केला पाहिजे.

स्वराज्याचे सुराज्य व्हावे यासाठी महाराजांनी 12 बलुतेदार आणि 18 पगडजातींना एकत्र आणून स्वराज्य उभे केले. अशा प्रकारे एक *युगप्रवर्तक राजा* म्हणून छत्रपती यांचा उल्लेख केला जातो.